महाराष्ट्र शासन
छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागांतर्गत स्वायत्त संस्था)

ई.मेल: foreignsch. sarthi2024@gmail.com
संकेतस्थळ:https://sarthi-maharashtragov.in
दूरध्वनी क्र. ०२०(२५५९२५३०)
दिनांक: १५ मे, २०२५


जा.क्र.सारथी/परदेश शिष्य/२०२५-२६/ दिनांक: १५/०५/२०२५

# जाहिरात

## "महाराजा सयाजीराव गायकवाड-सारथी गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना" अंतर्गत सन २०२५-२६" (एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत प्रवेश घेतलेले व घेणारे विद्यार्थी) यांचेकरिता

महाराष्ट्र राज्यातील अधिवासी असलेल्या "मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा" जातीतील गुणवंत मुला-मुलींना योजने अंतर्गत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका आणि संशोधनात्मक अभ्यासक्रमाचे (पीएच.डी) अभ्यासक्रमाकरिता **QS (Quacquareli Symonds) World Ranking** २०० च्या आत रॅन्कींग असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतला/घेणार असेल, अशा विद्यार्थ्यांकरिता नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक सारथी २०२२/प्र.क्र.२८९/का.१४२५- अ दि. २० जुलै २०२३ व सामाजिक न्याय व विशेष सहाय्यविभाग, शासननिर्णय क्र. सनवि २०२४/प्र. क्र.७७/बांधकामे, दिनांक- २५ जुलै, २०२४ नुसार सदर शिष्यवृत्ती योजने अंतर्गत अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर योजनेअंतर्गत खालील अभ्याक्रमांसाठी पात्र उमेदवाराकडून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी ऑनलाइन (Online) पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | पदव्युतर पदवी/ पदविका | डॉक्टरेट ( Ph.D) | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | अभियांत्रिकी | २० | ०५ | २५ |
| २ | वास्तूकलाशास्त्र | ०४ | ०२ | ०६ |
| ३ | व्यवस्थापन | ०२ | ०१ | ०३ |
| ४ | विज्ञान | १० | ०५ | १५ |
| ५ | वाणिज्य/ अर्थशास्त्र | ०४ | ०५ | ०९ |
| ६ | कला | ०४ | ०५ | ०९ |
| ७ | विधी अभ्यासक्रम | ०४ | ०१ | ०५ |
| ८ | औषध निर्माण शास्त्र | ०२ | ०१ | ०३ |
| | एकूण | ५० | २५ | ७५ |

**सदर शिष्यवृत्तीसाठी पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेत:**

- लाभार्थी हा मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी या जातीतील महाराष्ट्र राज्याचा रहिवासी व भारतीय नागरिक असणे आवश्यक आहे.
- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत प्रवेश घेतलेल्या व प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या परदेशातील शैक्षणिक संस्थेचे अद्यावत (सन २०२५) मधील) QS (Quacquarelli Symonds) World Ranking २०० च्या आत असणे बंधनकारक आहे.
- त्यामुळे एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधी व्यतिरिक्त कोणत्याही इतर उमेदवाराने/विद्यार्थ्याने अर्ज करू नये. अशा अपात्र विद्यार्थ्यांनी अर्ज केल्यास त्याची दखल घेतली जाणार नाही.
- उमेदवाराच्या पालकांचे कुटुंबाचे व उमेदवार नोकरी करीत असल्यास त्यांचे स्वतःचे उत्पन्न धरून सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्ष (२०२४-२५) मधील एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखापेक्षा जास्त नसावे.
- विद्यार्थी किंवा पालक किंवा दोन्ही नोकरीत असतील तर त्यांचे आयकर विवरणपत्र, फॉर्म न. 16 व सक्षम प्राधिकारी (तहसिलदार पेक्षा कमी दर्जा नसलेल्या) यांच्याकडील मागील आर्थिक वर्षाचे कुटुंबाचे सर्व मार्गानी मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
- इतर विद्यार्थ्यांसाठी सक्षम प्राधिकारी (तहसिलदार पेक्षा कमी दर्जा नसलेल्या) यांच्याकडील मागील आर्थिक वर्षाचे कुटुंबाचे सर्व मार्गांनी मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र, नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तहसीलदार यांचे उत्पन्नांचे प्रमाणपत्रासोबतच आयकर विवरण पत्र (ITR) सादर करण्यात यावे. ज्यांच्यासाठी आयकर विवरण पत्र भरणे बंधनकारक / आवश्यक नाही, त्यांनी तसे Affidavit सादर करावे. याबाबत कोणतीही चुकीची अथवा खोटी माहिती सादर केल्याचे आढळल्यास संबंधिताचे सर्व लाभ रद्द करून योग्य ती कायदेशीर/फौजदारी कारवाई व दिलेले लाभ वसुलीची कारवाई करण्यात येईल.
- विद्यार्थ्याने अर्जासोबत सादर केलेले कागदपत्रे सर्वांसाठी पाहण्यास खुले राहतील. सदर माहिती/कागदपत्रे खोटी अथवा बनावट असल्याचे आढळून आल्यास त्याच्या विरुध्द प्रचलित कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.
- परदेश शिक्षण शिष्यवृत्ती करिता Unconditional Offer Letter असावे. Unconditional असा शब्दश: उल्लेख काही ऑफ़र लेटर मध्ये दिसून येत नाही म्हणून फ़क्त conditional offer नसावी.
- या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता मिळणारे लाभ व निवड पद्धत, सुधारित वेळापत्रक इत्यादी माहितीकरिता सारथी संस्थेचे संकेतस्थळास **https://sarthi-maharashtragov.in/** वेळोवेळी भेट द्यावी.
- नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक सारथी २०२२ /प्र.क्र. २८९/का १४२५-अ दि. २० जुलै, २०२३ व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. सनवि २०२४/प्र. क्र.७७/बांधकामे, दिनांक- २५ जुलै, २०२४ मधील परिशिष्ठ-अ व परिशिष्ठ- ब मध्ये नमूद बाबीनुसार प्राप्त अर्जाबाबत मंजुरीची कार्यवाही करण्यात येईल.
- इच्छुक उमेदवारांनी **fs.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर **नियोजन विभाग (Planning Department)** या विभागाच्या **link वर ऑनलाइन (Online) पद्धतीने अर्ज** भरावा व ऑनलाइन (Online) भरलेल्या अर्जाची मूळ प्रत, प्रमाणपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रती पडताळणीसाठी, आवश्यक त्या कागदपत्रासह दिनांक- १६ जून, २०२५ पर्यंत सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत समक्ष सारथी, सामाजिक न्याय विभाग, कक्ष-४०७, मुख्यालय इमारत, गोपाळ गणेश आगरकर रोड, पुणे, महाराष्ट्र – ४११००४ येथे सादर करावे. कमी अर्ज प्राप्त झाल्यास मुदतवाढ देण्याचा अधिकार सारथी संस्थेस राहील.
- सदर शिष्यवृत्तीबाबत महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाने सर्वंकष धोरणाने घेतलेला निर्णय अंतिम राहिल. जाहिरातीमधील नमुद अटी व शर्तीमध्ये व लाभामध्ये महाराष्ट्र शासनाकडून काही बदल झाल्यास त्या त्या वेळी लागू राहतील. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**टीप:-** ऑनलाइन (Online) स्वरूपातील अर्जाशिवाय इतर कोणत्याही पद्धतीने अर्ज सादर केल्यास तो अर्ज विचारात घेतला जाणार नाही. इच्छुक उमेदवारांनी वरील नमूद कालावधीतच अर्ज दाखल करण्याची दक्षता घ्यावी.

**स्वाक्षरीत /-**
**राजेंद्र निंबाळकर (भा.प्र.से.)**
**व्यवस्थापकीय संचालक,सारथी,पुणे**